महापालिका आयुक्त यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका, पुणे -५
जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/६१२८
दिनांक ०८/१२/२०२०

# आदेश

विषय - अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल), अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) व अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) यांचे नियंत्रणाखालील विभागांबाबत.

संदर्भ – १) आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/५३५७, दिनांक ०२/११/२०२०.

२) मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र.१/४१५, दि. २४/११/२०२०.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल), अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) व अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) यांचे नियंत्रणाखाली सोपवावयाचे विभाग संदर्भ क्र. १ च्या आदेशान्वये प्रसृत करण्यात आले आहेत. सदर आदेशामध्ये कामगार कल्याण विभाग हा अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांचे नियंत्रणाखाली सोपविण्यात आला आहे.

संदर्भ क्र. १ चे आदेशामध्ये अंशात: बदल करण्यात येत असून अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांचे नियंत्रणाखालील कामगार कल्याण विभाग हा अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचे नियंत्रणाखाली या आदेशाच्या दिनांकापासून सोपविण्यात येत आहे.

तरी संबंधीत खातेप्रमुख यांनी वरीलप्रमाणे व्यवस्थेबाबत नोंद घ्यावी.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत :- १) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/इ/वि), पुणे महानगरपालिका यांजकडेस माहितीस्तव,

२) सर्व खातेप्रमुख, पुणे महानगरपालिका, पुढील कार्यवाहीकरिता . . .